## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये /मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**महोदय/महोदया,**

मा.संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, मध्यवर्ती इमारत, पुणे यांचे क्र.उशिसं/२०१६/ऑनलाईन प्रवेश/मवि-१/१३१८४, दि.२२/११/२०१६ चे सर्व अभ्यासक्रमांचे प्रवेश ऑनलाईन होणेच्या अनुषंगाने अकृषी विद्यापीठे व संलग्न महविद्यालये यांचेकडे शासन स्तरावर "एकसंघ संगणक प्रणाली पध्दती" कार्यरत करणेबाबतचे पत्र आपल्या माहितीसाठी अग्रेषित केले आहे. त्यास अनुसरून महाविद्यालयांत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया तसेच अंतर्गत कामकाजाकरिता नव्याने कोणतीही संगणक प्रणाली विकसित करून नये, तसेच त्याकरिता निविदा प्रकिया सुरू करण्यात येऊ नये.

कळावे,

आदेशान्वये,

I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 178
दि. 20 DEC 2016

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं. ०२० / २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.- ०२० २६१२११०३

क्र.उशिसं/२०१६/ऑनलाईन प्रवेश/मोन-१ / 13918 दिनांक- ३१/११/२०१६

प्रति.

१) कुलसचिव.
सर्व अकृषी विद्यापीठे.

२) विभागीय सहसंचालक.
उच्च शिक्षण. सर्व विभाग.

विषय- <u>सर्व अभ्यासक्रमांचे प्रवेश ऑनलाईन होणेबाबत.</u>
उच्च शिक्षण संचालनालय व महाराष्ट्र शासनास वेळोवेळी लागणाऱ्या माहिती करिता अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये यांचेकडे शासन स्तरावर "एकसंध संगणक प्रणाली पद्धती" कार्यरत करणेबाबत.

संदर्भ- शासन पत्र क्र.संकीर्ण- २०१६/प्र.क्र.३१/१६ /विशि-३ . दि.१७.११.२०१६

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये सर्व अभ्यासक्रमांचे प्रवेश ऑनलाईन करावयाचे आहेत व "एकसंध संगणक प्रणाली पद्धती " राबवायची आहे. तसेच अंतर्गत कामकाज करण्याकरिता "एकसंध संगणक प्रणाली पद्धती" मध्ये पुढील गोष्टींचा समावेश करावयाचा आहे. ज्यामध्ये रियलटाइम वर्कलोड , सेवा पुस्तकांची माहिती , ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, विद्यार्थ्यांची विविध प्रकारे वर्गीकृत माहिती. आधार कार्ड आधारित शिष्यवृत्ती , शिष्यवृत्ती करिता महाविद्यालयांकडून शासनास वेळोवेळी लागणारी आर्थिक बिले व तपास माहिती , विद्यार्थ्यांच्या बोगस प्रवेशांवर नियंत्रण आणणे, विद्यार्थ्यांसाठी बायोमॅट्रिक प्रणाली व शिक्षकांचे वेतन बायोमॅट्रिक प्रणालीशी जोडणे तसेच सर्व महाविद्यालयांचा डेटा एकाच प्रकारे शासनास उपलब्ध करून देणे इत्यादी.

उपरोक्त संदर्भिय शासन पत्रान्वये महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांकरिता सर्व अभ्यासक्रमांचे प्रवेश ऑनलाईन करणे व अंतर्गत कामकाजाकरिता सर्व समावेशक "एकसंध संगणक प्रणाली पद्धती " उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

आपल्या विद्यापीठांत व संलग्नित महाविद्यालयांत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया तसेच अंतर्गत कामकाजाकरिता नव्याने कोणतीही संगणक प्रणाली विकसित करू नये तसेच त्याकरिता निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येऊ नये. सदरबाबत आपल्या अधिनस्त शैक्षणिक संस्था, महाविद्यालयांना याबाबत त्वरीत सूचना निर्गमित करण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीबाबत संचालनालयास अवगत करावे.

(डॉ. धनराज माने)
संचालक
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे- १

प्रत-

१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) प्राचार्य, सर्व महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.- उचित कार्यवाहीस्तव.